**होमिओपॅथी महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत**

**रत्नदीप मेडिकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर संचलित जामखेड होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहमदनगर.**

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एचएमसी-२०१३/प्र.क्र.१५२/१३/शिक्षण-१,
९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- १२ ऑक्टोबर, २०१७

वाचा :-
१. शासनाचे समक्रमांकाचे, दिनांक २६.०८.२०१६ चे ना-हरकत प्रमाणपत्र
२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे क्र.मआविवि/पीबी/युजी/कन्सेंट/इक्स १/होमिओपॅथी/२६३/२०१६, दिनांक ११.०४.२०१६ चे पत्र
३. आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्र. F.No.R.१२०१४/०१/२०१६-EP(H), दिनांक २८.०९.२०१७ चे पत्र

**प्रस्तावना:-**

रत्नदीप मेडिकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर संचलित जामखेड होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहमदनगर या होमिओपॅथी महाविद्यालयास संदर्भाधीन पत्र क्रमांक १ अन्वये १०० विद्यार्थी क्षमतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (३) अन्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी संस्थेच्या सदर महाविद्यालयास मान्यता दिलेली आहे. सदर बाब विचारात घेता संस्थेच्या होमिओपॅथी महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी होमिओपॅथी महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

रत्नदीप मेडिकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर संचलित जामखेड होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहमदनगर या होमिओपॅथी महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (३) अन्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर होमिआपॅथी महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१. रत्नदीप मेडिकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर संचलित जामखेड होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहमदनगर या होमिओपॅथी महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार १०० एवढी राहील.

२. राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/अधिनियम/शासन निर्णय तसेच मा.सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. केंद्र शासन, केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी होमिओपॅथी अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. शासकीय होमिओपॅथी किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करु नये.

९. केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०१७-१८ वर्षाकरिता प्रवेशित होणारे विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये दाखल होईपर्यंत असून संस्थेने त्यानुसार पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

१०. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण अथवा तत्सम प्राधिकरण यांच्याकडुन करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भ क्र.(३) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.श्री.पुं.कोतवाल)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबा र हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. अधिष्ठाता/प्राचार्य, रत्नदीप मेडिकल फाऊंडेशन अॅन्ड रिसर्च सेंटर संचलित जामखेड होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहमदनगर ४१३ २०१
१०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
११. अधिष्ठाता, सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालये.
१२. अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ अन एडेड प्रायव्हेट ॲण्ड डेंटल, कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई.
१३. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, गर्व्हमेंट पॉलीटेक्निक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू) मुंबई-५१.
१४. अवर सचिव, (शिक्षण २), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई
१५. निवडनस्ती (शिक्षण-१).